## निशाणी क्र.१९० वरील आदेश

सदरचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रीया संहिता आदेश २२ नियम ४ प्रमाणे प्रतिवादीचे वारस रेकॉर्डवर घेण्यास दाखल केला आहे.

०२. वादीचे असे कथन आहे की, सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.१७ सुवर्णा कुंडलिक चव्हाण या दि.३१.१२.२०२५ रोजी बलवडी(भा.), ता.खानापूर, जि.सांगली येथे मयत झालेल्या आहेत. सदरील दाव्याचे कामी मयत प्रतिवादी क्र.१७ सुवर्णा चव्हाण यांचे वारस रेकॉर्डवर येणे आवश्यक आहे. परंतू, या दाव्याचे कामी प्रतिवादी क्र.१७ सुवर्णा चव्हाण यांचे वारस म्हणजेच वादी क्र.५ ते ७ व प्रतिवादी क्र.१६ हे दाव्याचे कामी पूर्वीपासून सामील असलेने व त्यांचे व्यतिरीक्त अन्य कोणीही प्रतिवादी क्र.१७ यांना कायदेशीर वारस नसलेने त्यांचे नावापुढे मयत वारस लिहून कंस करणेत यावा व प्रतिवादी क्र.१७ यांचे वारसांची नि.क्र.१ व दाव्याचे रजिस्टरमध्ये नोंद करणेत यावी अशी विनंती वादी यांनी केली आहे.

०३. प्रतिवादी क्र.१२(अ),१२(ब),१२(क) यांनी वादी यांच्या सदरच्या अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल वादी यांच्या अर्जातील मजकूर मान्य नसलयाचे कथन केले आहे. तरी वादीचा अर्ज नामंजूर करावा अथवा कॉस्ट करणेत यावी अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

०४. दोन्ही पक्षांच्या जेष्ठ विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. दाखल कागदपत्रांचे व अभिलेखाचे अवलोकन केले. वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी

यांच्याविरुध्द दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होऊन मिळणेसाठी व मनाई हुकुमासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१७ सुवर्णा कुंडलिक चव्हाण या दि.३१.१२.२०२५ रोजी मयत झाल्या आहेत. त्यांचा मृत्यूचा दाखला नि.क्र.१८९ अन्वये अभिलेखावर दाखल आहे. अर्जात उल्लेख केल्याप्रमाणे सदर मयत प्रतिवादी क्र.१७ यांचे वारस हे प्रस्तुत दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार आहेत. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मयत प्रतिवादी क्र.१७ सुवर्णा चव्हाण यांचे वारस वादी क्र.५ ते ७ व प्रतिवादी क्र.१६ हे पूर्वीपासून दाव्यात समाविष्ट असलेचे दिसून येते. करीता, वादी करीत असलेल्या विनंती प्रमाणे प्रतिवादी क्र.१७ यांच्या नावापुढे मयत वारस लिहून कंस करणेत यावा व प्रतिवादी क्र.१७ यांचे वारसांची नोंद नि.क्र.१ व दाव्याचे रजिस्टरमध्ये करण्यात यावा, असा आदेश पारीत करुन प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे;

## आदेश

१) वादी यांचा निशाणी क्र.१९० वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२) वादीतर्फे वारसांनी अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती या अर्जाचे आदेशापासून पुढील तारखेपर्यंत करावी व दुरुस्त अर्जाची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

३) सदर दुरुस्तीची नोंद दाव्याचे नोंद रजिस्टरमध्ये घेणेत यावी.

VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE

Digitally signed by VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE
Date: 2026.04.04 18:00:17 +0530

विटा. (श्रीमती.व्ही.डी.शिरसे)

दि.०१.०४.२०२६ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,विटा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | G.U.Varude, |
| Name of the Court | :- | Smt. V.D.Shirse,<br>Jt.Civil Judge Jr.Dn.,& J.M.F.C.<br>Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- | 01.04.2026 |
| Signed by P.O. on | :- | 01.04.2026 |
| Uploaded on | :- | 04.04.2026 |